| | | |
|---|---|---|
| | **बृहन्मुंबई महानगरपालिका**<br>**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व**<br>**वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई – 22.** | |

**लोटिरु/7945/परि आस्था दि. 19/06/2025**

# जाहिरात

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई – 22. येथे अधिपरिचारीकांची कंत्राटी पध्दतीने करारनामा सापेक्ष नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जाचे शुल्क रुपये 790+18% GST, रोखपाल विभाग, कॉलेज बिल्डींग, तळमजला, रुम नं 15, शीव, मुंबई – 400 022 येथे दि 23.06.2025 ते दि 30.06.2025 पर्यंत रोखीत स्विकारले जातील.

परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतींसह व अर्जाचे शुल्क भरल्याच्या पावतीसह शनिवार, रविवार व सुट्टीचा दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत आवक-जावक विभाग, तळ मजला, विद्यालय इमारत, लो.टि.म.स. रुग्णालय, येथे दि 23.06.2025 ते दि 01.07.2025 पर्यंत स्विकारले जातील. दि 01.07.2025 रोजी संध्याकाळी 3.00 या वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कुठल्याही प्रकारचा पत्र व्यवहार स्विकारला जाणार नाही.

**कंत्राटी पदांचा तपशील**

| अनु. क्र. | संवर्ग | निश्चित ठोक प्रति माह वेतन | अर्जाचे शुल्क स्विकारण्याचा कालावधी | अर्ज स्विकारण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1. | अधिपरिचारिका (कंत्राटी तत्वावर) | रु. 30,000/- | दि 23.06.2025 ते दि 30.06.2025. 11.00 ते दुपारी 3.00 | दि 23.06.2025 ते दि 01.07.2025. 11.00 ते दुपारी 3.00 |

❖ **शैक्षणिक अर्हता :-**

1. उमेदवार बारावी पास व परिचरिका पदासाठी आवश्यक असलेली जीएनएम ही पदवी धारण केलेली असावी.
2. उमेदवार मान्यताप्राप्त नर्सिंग कौन्सिलचा नोंदणीकृत असावा, किंवा त्यांनी Nursing Council चे Registration 3 महिन्यात मिळवावे.

❖ **वयोमर्यादा :-**

1. उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 43 वर्षा पेक्षा अधिक नसावे.
2. अर्जासोबत जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे अनिवार्य आहे.

❖ **सर्वसाधारण अटी :-**

1. **उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र,नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.**
2. **उमेदवाराने अर्जावर स्वत:चा भमणध्वनी क्रमांक व ई मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.**
3. **उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी /न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.**
4. **निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.**
5. **प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.**
6. **उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.**
7. **निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.**
8. **सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.**
9. **सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.**
10. **कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 8 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.**
11. **नियुक्ती झालेल्या उमेदवारास म.न.पा. मध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.**
12. **लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई – 22. येथे रुग्णालयात कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.**
13. **निवड झालेल्या उमेदवारांना प्रत्येक 180 दिवसानंतर एक दिवसाचा सेवाखंड देण्यात येईल.**

❖ **विशेषसुचना :**

1. अधिपरिचारीका या पदावर कंत्राटी तत्त्वावर करावयाच्या अर्जाचा नमुना सदर जाहिरातीसोबत जोडण्यात आला आहे  सदर नमुन्यात सादर केलेला अर्जच ग्राह्य धरण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
3. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
4. टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
5. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराची अधिपरीचारीका पदावर नेमणूक, अस्थापनेवरील पदे जसजशी रिक्त होतील त्याप्रमाणात करण्यात येईल.
6. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्रमाणपत्र पडताळणी करीता आधार कार्ड, पॅन कार्ड, बँकेचे Cancelled Cheque, पासबुकाची छायांकीत प्रत व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतिसह आणि साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतींसह स्वखर्चाने उपस्थित राहावे.
7. सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रांसह सादर केलेलेच अर्जच ग्राह्य धरण्यात येईल.
8. भरती प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक वेळोवेळी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या छायांकित प्रति व अलीकडेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवुन,अर्जाचे शुल्क भरल्याच्या पावतीसह विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेला अर्ज आवक-जावक विभाग, तळ मजला, विद्यालय इमारत, लो.टि.म.स. रुग्णालय येथे दि 23.06.2025 ते  दि 01.07.2025 शनिवार व रविवार सोडून कार्यालयीन वेळेत सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्विकारला जाईल. दि 01.07.2025 रोजी दुपारी 3.00 या वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबतीतील कुठल्याही प्रकारचा पत्र व्यवहार स्विकारला जाणार नाही.

भरती प्रक्रियेबाबतचे अंतिम निर्णय व सदरबाबत बदल करण्याचे अधिकार प्रशासनाकडे राहतील. तसेच उपरोक्त पदाकरीता नियुक्त होणा-या उमेदवारांना महानगरपलिकेची सेवा-नियमावली व इतर कुठल्याही प्रकारचे फायदे लागू होणार नाहीत. भरती प्रक्रियेच्या कोणत्यही टप्प्यावर पदांच्या संखेत बदल करण्याचे अधिकार प्रशासनाकडे राहतील.

-- सहि --

19/06/2025.

अधिष्ठाता
लो.टि.म.स.रुग्णालय,शीव,
मुंबई 400 022.

सोबत – अर्जाचा नमुना

अर्जाचे शुल्क - **790+GST**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

| **Passport** |
| --- |
| **Size** |
| **photograph** |

**पदाचे नांव - प्रशिक्षित अधिपरिचारिका (कंत्राटी तत्वावर)**

**वैयक्तिक माहितीपत्र**

रजिस्टर नोंदणी क्रमांक : ............................................ पावती क्रमांक : . ....................................

पदनाम : परिचारीका भरती प्रक्रीया वर्षे – 2025-2026.

परिचार्या शाळेचे नांव : ............................................ उत्तीर्ण वर्ष (GNM) : ................................

उमेदवाराचे संपूर्ण नांव : ..............................................................................................................

वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव ..............................................................................................................

विवाहापूर्वीचे संपूर्ण नांव ..............................................................................................................

संपुर्ण पत्ता : ..............................................................................................................

..............................................................................................................

................................................................. पिनकोड ............................

जन्म दिनांक व वय : / / वय

दूरध्वनी / भ्रमाणध्वनी क्रमांक : 1. .............................................. 2. ..............................................

E-Mail ID : ..................................................................................................

महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल रजिस्टर नोंदणी क्रमांक ..................................................................................

दिनांक / /

| वर्ष | पैकी गुण | प्राप्त गुण | प्रयत्न/ Attempt | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- | --- |
| 10 वी | | | | |
| 12 वी | | | | |
| **नर्सिंग डिप्लोमा GNM** | | | | |
| प्रथम वर्ष | | | | |
| द्वितीय वर्ष | | | | |
| तृतीय वर्ष | | | | |
| एकुण | | | | |

1. स्थानिक पोलीस ठाण्याचा ..........................................................................................
   संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) ..........................................................................................
   .......................................... पिनकोड ............................................

2. उंची : ............................ वैयक्तिक खुण .......................................................

3. 10 वी / 12 वी मध्ये मराठी विषय - आहे / नाही

4. संगणक विषयक ज्ञान आहे / नाही

5. उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा कसे – असल्यास त्याबाबतचा तपशील - होय / नाही.

   संस्थेचे नांव व पत्ता ..........................................................................................................................

6. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का? होय / नाही.

   असल्यास, त्याबाबतचा तपशील द्यावा. उमेदवारास पूर्वी शिक्षा झली होती का? होय / नाही.

7. शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी.

8. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नीवनतम प्रमाणपत्र (Non-Cream layer) आहे / नाही

मी ................................................................................................ प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनार व शैक्षणीक अर्हतेनुसार मी पात्र आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टपप्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्या विरुध्द कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विशवासू

अर्जदाराची सही /-

अर्जदाराचे नांव /-